# निशाणी क्र. १९ वरील आदेश

वादीने प्रस्तूतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे आदेश ६, नियम १७ प्रमाणे वादपत्रात दुरूस्तीसाठी व प्रस्तूत अर्जाप्रमाणे मजकूर समाविष्ट करण्यासाठी दाखल केलेला आहे.

०२. प्रस्तूत अर्जात वादी यांनी असे नमूद केले आहे की, प्रस्तूत दावा त्यांनी अतिक्रमीत जमीनीचा ताबा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. तसेच सदरील कोर्ट कमिशनर यांच्या अहवालाप्रमाणे वाद मिळकतीच्या अतिक्रमीत क्षेत्राबाबत प्रस्तुत अर्जात नमुद केलेला मजकूर मुळ दाव्यात समाविष्ट करणे आवश्यक आहे. म्हणून वादी यांनी प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

०३. प्रस्तूत अर्जावर प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांचा लेखी खुलासा दाखल करून असे नमुद केले आहे की, प्रस्तूत अर्ज मंजूर केल्यास दाव्याच्या मुळ स्वरूपात बदल होणार आहे. म्हणून प्रस्तूतचा अर्ज बेकायदेशीर असल्यामुळे नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०४. असे की, प्रस्तूतचा अर्ज त्यावरील लेखी म्हणणे तसेच अभिलेखावर असलेल्या सर्व दस्तऐवजांचे अवलोकन केले. तसेच दोन्ही पक्षकारांच्या विव्दान वकिलांचा युक्तीवाद ऐकला असता, प्रस्तूत अर्जात पुढील प्रमाणे मुद्दे उपस्थित होतात. त्यावर मी कारण मिमांसेसह निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी हे प्रस्तूत अर्जातील मागणी प्रमाणे दावा दुरूस्ती करून मिळण्यास पात्र आहेत का ? | होय |
| २. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

०५. असे की, वादी यांनी प्रस्तूतचा दावा वाद मिळकतीवरील प्रतिवादी यांचा अतिक्रमीत ताबा काढून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. तसेच प्रस्तूतचा दावा प्रतिवादी यांच्या विरूध्द दाखल झालेला आहे. असे की, प्रस्तूत दाव्यातील वादी यांच्या निशाणी क्र. ०५ चे अर्जावरील आदेशाप्रमाणे, तालुका निरीक्षक भुमि अभिलेख भोकरदन यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक करण्यात आली होती. सदरील आदेशाप्रमाणे कोर्ट कमिशनर यांनी दावा मिळकतीची मोजणी करून, त्याप्रमाणे निशाणी क्र. १८ अन्वये सदरील मोजणी अहवाल नकाशासह अभिलेखावर दाखल केलेला आहे.

०६. असे की, प्रस्तुत मुळ दावा हा अतिक्रमीत क्षेत्र काढून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. म्हणून सदरील मोजणी अहवालाप्रमाणे नमूद अतिक्रमीत क्षेत्राबाबतचा मजकूर प्रस्तूत दाव्यात अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मुळ दाव्यात समाविष्ट करणे आवश्यक आहे. त्यामुळे दाव्याच्या मुळ स्वरूपाचा विचार करता, सदरील अर्जात नमुद मजकूर समाविष्ट करणे आवश्यक आहे.

०७. असे की, प्रस्तूत दाव्याचे स्वरूप विचारात घेता नमूद दुरूस्ती केल्याने दाव्याच्या मुळ स्वरूपात कुठलाही बदल होणार नाही. तसेच सदरील दुरूस्ती मंजूर केल्यास प्रतिवादी यांचे कुठलेही नुकसान होणार नाही. म्हणून वरील सर्व कारणमिमांसेचा विचार केला असता. प्रस्तूत दाव्यातील सर्व वाद मुद्दे गुणवत्तेवर निकाली काढण्यासाठी, प्रस्तूतचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणून मुद्या क्र. १ चे उत्तर मी होकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्या क्र. २ करीता**

प्रस्तूत मुद्याच्या निष्कर्षासाठी खालीलप्रमाणे अंतिम आदेश करण्यात येत आहे.

## आदेश

१. प्रस्तूतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे आदेश ६ नियम १७ अन्वये मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी यांना प्रस्तूत अर्जातील मागणी प्रमाणे दावा दुरूस्ती करून अर्जातील मजकूर मुळ दाव्यात समाविष्ट करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

३. वादी यांनी आदेशात नमुद केल्याप्रमाणे दावा दुरूस्ती करून सदरची दुरूस्तीची प्रत आज पासून १४ दिवसांच्या आत न्यायालयात दाखल करण्यात यावी.

स्वाक्षरित/—

(एस. एस. बजाज)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर
भोकरदन.

दिनांक : २२.१०.२०१९.